CAREERINDIA

**RR+PR**

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** ವಿಷಯ : **ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ**

Code No. : **08-M** **Subject : First Language — MARATHI**

**( ಹಳೆ ಪಠ್ಯಕ್ರಮ / Old Syllabus )**

**( ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ + ಪುನರಾವರ್ತಿತ ಖಾಸಗಿ ಅಭ್ಯರ್ಥಿ / Regular Repeater + Private Repeater )**

**सामान्य सूचना :**

i) प्रश्न व उत्तर पत्रिका एकत्रित आहेत. त्यात वस्तुनिष्ठ व विवरणात्मक असे एकूण 63 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच पूर्ण उत्तर, संकेताक्षरासह लिहावे.

iii) विवरणात्मक प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे. त्याच ठिकाणी आपली उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) वस्तुनिष्ठ आणि विवरणात्मक प्रश्नांसमोर दिलेल्या सूचने प्रमाणे उत्तरे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत, लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा, आकृति, आलेख व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा व जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणा खुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे. त्याचा उपयोग प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

viii) उजवी कडील मोकळ्या मार्जिनमधील दिलेल्या जागेत कांही लिहू नका.



www.careerindia.com

CAREERINDIA



I. खाली दिलेल्या पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा : 15 × 1 = 15

1. बाईसा श्रीचक्रधर स्वामींच्या कपाळावर याचा टिळा लावत असे

(अ) कुंकवाचा (ब) कस्तुरीचा

(क) गंधाचा (ड) हळदीचा.

2. रावसाहेबांच्या घोड्याचे नाव हे होते

(अ) बोर (ब) पवन

(क) चेतक (ड) दिलपाक.

3. आजी फक्त याला घाबरत होती

(अ) हत्ती (ब) वाघ

(क) उंदीर (ड) माकड.

4. कोरडी भिक्षा या वारी मागितली जाई

(अ) रविवारी (ब) गुरुवारी

(क) शनिवारी (ड) सोमवारी.

5. 'पर्वणी' या कवितेचा वाङ्मयप्रकार हा आहे

(अ) पोवाडा (ब) गझल

(क) लावणी (ड) कव्वाली.

6. शबरी श्रीरामाचे चरण याने धुते

(अ) अश्रूने (ब) दुधाने

(क) पाण्याने (ड) निरमाने.

7. 'जायंट व्हील' ही कादंबरी यांची आहे

(अ) शांता शेळके (ब) नारायण सुर्वे

(क) वामन निंबाळकर (ड) निरंजन उजगरे.



www.careerindia.com

CAREERINDIA



8. रुक्मिणी या रंगाची पैठणी नेसली आहे.

(अ) निळ्या (ब) काळ्या

(क) हिरव्या (ड) जांभळ्या.

9. 'माणसांचे अभयारण्य' या कवितेचे मूल्य हे आहे

(अ) परोपकार (ब) मानवता

(क) देशप्रेम (ड) मातृप्रेम.

10. 'देव नाही असे मानणारा' शब्द समूहाबद्दल एक शब्द द्या

(अ) आस्तिक (ब) नास्तिक

(क) क्रूर (ड) राक्षस.

11. खालीलपैकी 'तद्‌भव' शब्द हा आहे

(अ) गाव (ब) धर्म

(क) तत्वज्ञान (ड) न्याय.

12. 'सप्तमी' विभक्तीचे प्रत्यय हे आहेत

(अ) ऊन, हून (ब) त, ई, आ

(क) चा, ची, चे (ड) स, ला, ते.

13. "आम्ही सहलीमध्ये विजापूरचा गोलघुमट पाहिला" या वाक्यात हा काळ आहे

(अ) वर्तमान काळ (ब) भूतकाळ

(क) भविष्य काळ (ड) रीती वर्तमान काळ.

14. "सर्कशीतील पांढ-या घोड्यांनी उत्तम खेळ केला" यात 'पांढ-या' या शब्दाची जात ही आहे

(अ) गुण विशेषण (ब) नाम

(क) क्रियापद (ड) क्रिया विशेषण.



www.careerindia.com

CAREERINDIA



15 . 'आकाश' याचा समानार्थी शब्द हा आहे

(अ) मेघ (ब) ढग

(क) गगन (ड) पवन.

II. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा : 5 × 1 = 5

16. 'मातबर खासे पळो लागले' या पाठाचे मूळ लेखक ................ हे आहेत.

17. मराठी भाषेला निर्माण झालेला धोका ............. नी ओळखला होता.

18. 'यथार्थ दीपिका' ही गीतेवरील टीका .......... यांनी लिहिली.

19. 'आम्ही कोण ?' ही मूळ कविता ........... यांची आहे.

20. अंथरुण पाहून .......... म्हणं पूर्ण करा.

III. 21. योग्य जोड्या जुळवा : 5 × 1 = 5

| | अ | | ब |
|---|---|---|---|
| 1) | बापखुमादेवीवरु | (i) | ज्ञानेश्वर मुळे |
| 2) | आम्ही कोण ? | (ii) | किरण बेदी |
| 3) | सायंकाळचा पूजावसर | (iii) | केशवकुमार |
| 4) | आजी शरण येते | (iv) | बाई देवबास |
| 5) | एक गाव एक पाणवठा | (v) | केशवकुमार |
| | | (vi) | विद्याधर पुंडलिक |
| | | (vii) | कुसुमाग्रज |
| | | (viii) | संत ज्ञानेश्वर. |

IV. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा : 10 × 1 = 10

22. 'शारदा' या नाटकात कोणती समस्या मांडली आहे ?

23. 'शाळा' या पाठाचे लेखक कोण आहेत ?

24. भागवत संप्रदायाची स्थापना कोणी केली ?

25. पुत्र व कामिनी कशाचे साथी आहेत ?

26. आई रानात कशासाठी जात असे ?

www.careerindia.com

CAREERINDIA



27. 'माय' या कवितेचे मूल्य कोणते ?

28. माणसांच्या अभयारण्यात कशाचे शिक्के नसतीत ?

29. "बाळा, तुझे नाव काय ?" या वाक्याचा प्रकार कोणता ?

30. 'शोषण' याचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

31. "आम्ही चीनची भिंत पाहिली" या वाक्यात कोणता प्रयोग आहे ?

V. खालील प्रश्नांची उत्तरे **दोन** ते **तीन** वाक्यात लिहा : $15 \times 2 = 30$

32. कांचनभट शारदेला घरातून चालती हो असे का म्हणतात ?

33. "हे काय आणिक ? कुठं ? " संदर्भासह स्पष्टीकरण करा.

34. कुळवाडी लोक लेखकावर का जळत असत ?

35. गावातल्या तळ्या बाबत लेखकाच्या मनात कोणते शल्य होते ?

36. टाकळीला 'सैनिक टाकळी' असे नाव का पडले ?

37. लेखकाला हिराच्या आई वडिलांविषयी प्रेम का वाटत असे ?

38. कान व हात कशाने शोभून दिसतात ?

39. चाफा कवयित्रीला काय म्हणाला ?

40. कृशमोळीवाली पाहिल्यावर कवी तिची मोळी का विकत घेतो ?

41. बंगला कोसळण्याची खरी कारणे कोणती होती ?

42. खालील ओळीतील अलंकार ओळखून लक्षणे सांगा :

    "क्रीडांगण जणू चंचल सुंदर भाल तुझे हे गडे"

43. खालील संधींचा विग्रह करुन प्रकार लिहा :

    अ) दिगंतर

    ब) पुनर्वसन.

www.careerindia.com

CAREERINDIA



44. खालील ओळीचे गण पाहून वृत्त ओळखा.

    आम्ही कोण ? म्हणून काय पुसतां दांताड वेंगाडुनी

45. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करुन प्रकार लिहा :

    अ) नातीगोती

    ब) कुलस्वामिनी

46. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) पालनपोषण करणे

    ब) शहीद होणे.

VI. खालील प्रश्नांची **पाच** ते **सहा** वाक्यात उत्तरे लिहा : 10 × 3 = 30

47. लोकहितवादींनी लोकांना कसे सावध केले आहे ?

48. इंग्रजी भाषेमुळे मराठीला निर्माण झालेले धोके कोणते ?

49. ''अपघात'' या कथेतून लेखिकेने कोणता संदेश दिला आहे ?

50. तिहार जेलमधील स्त्री कैद्यांच्या भेटीचे वर्णन कसे केले आहे ?

51. डॉ० माशेलकरांच्या जीवनातील अविस्मरणीय प्रसंग कोणता ?

52. उखळास बांधल्यानंतर श्रीकृष्णाने काय केले ?

53. ''एकवीसावे शतक समोर असताना सोळाव्यास्तव रडू नका'' असे कवी का म्हणत आहे ?

54. शबरीने श्रीरामाची पूजा कशाप्रकारे बांधली ?

55. रुक्मिणीचा पेहराव कसा आहे ते सांगून तिच्या माहेराचे वर्णन करा.

56. बहुत लोकांना मेळवून काय करावे असे समर्थ म्हणतात ?

www.careerindia.com

CAREERINDIA



VII. खालील प्रश्नांची **आठ** ते **दहा** वाक्यात उत्तरे लिहा : 4 × 4 = 16

57. वटवृक्षावर दिवसभर येणा-या पक्षांचे वर्णन मारुती चित्तमपल्ली यांनी कसे केले आहे ?

58. वेगवेगळ्या ऋतूंमध्ये चीनची भिंत कशी दिसते ?

59. कोळ्यांच्या दिनचर्येचे वर्णन करा.

60. खालील पद्यपंक्ती पूर्ण करा :

रात्रीचे वनदेव ..........................................................

..........................................................................

..........................................................................

............................................................. विखारी भरी.

VIII. 61. खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 4 × 1 = 4

''जो आवडतो सर्वांना, तोचि आवडे देवाला'' ह्या शब्दातच ख-या ईश्वरपूजनाचे रहस्य सांगितले आहे. दीन दुबळ्यांची, अनाथ-अपंगांची सेवा हीच खरी ईश्वरपूजा आहे. माणुसकी हा धर्म आहे. जनसेवाहीच खरी ईश्वर सेवा. आपण ईश्वराला मंदिरात, वन उद्यानात शोधतो, पण तो दीनदलितांची करुणाभरी व्यथा बनून, दु:खितांच्या हारी आपल्यासाठी तिष्ठत असतो. आपण दगडाच्या देवाला पंचपक्वान्नाचा नैवेद्य दाखवितो पण भुकेलेले जीव घासभर अन्नासाठी तळमळत असतात. भुकेलेल्यांच्या ओठी घातलेला घासच ईश्वराप्रत पोचतो. दीन दु:खितांचे अश्रू पुसले, रोगग्रस्तांची सेवा केली, तर ती खरी ईश्वरसेवा घडेल. भव्यमंदिर उभारण्यापेक्षा शाळेसाठी इमारत बांधून, गरजू व गरीब विद्यार्थ्यांच्या विनामूल्य शिक्षणाची सोय करावी. एखादे हॉस्पिटल उभारुन गरिबांच्या औषधोपचारांची सोय केली तर ते महान पुण्य कृत्य ठरेल.

**प्रश्न :**

i) खरी ईश्वरपूजा कोणती ?

ii) विपरित भक्ती कशी केली जाते ?

iii) महान पुण्यकृत्य कोणते ?

iv) वरील उता-याला योग्य शीर्षक द्या.



www.careerindia.com

CAREERINDIA



IX. 62. तुमच्या धाकट्या भावास स्वच्छतेचे महत्व पटवून देणारे पत्र लिहा. 5

**किंवा**

तुम्ही बहिणीच्या लग्नासाठी चार दिवस परगावी जाणार आहात. त्यासाठी वर्ग शिक्षकांना रजेचा अर्ज लिहा.

X. 63. खालील पैकी कोणत्याही **एका** विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लिहा :

$1 \times 5 = 5$

(1) वृक्ष आमुचे साथी

(2) पर्यावरण प्रदूषण

(3) लोकसंख्यावाढ-एक समस्या.

www.careerindia.com